आवास आणि भूमी अधिकार संगठन
(हाऊसिंग एंड लैंड राईट्स नेटवर्क) नवी दिल्ली आणि

CRH

घर हक्क समिती (CRH) मुंबई

# जबरदस्तीने बेदखल केलेल्या स्थितीमध्ये काय करु ?

## एक पुस्तिका



मराठी भाषांतर - संजय कांबळे (घर हक्क समिती) मुंबई
मूळ विषयवस्तू (इंग्रजी) : शिवानी चौधरी,
अब्दुल शकील, स्पंदना बत्तुला

प्रकाशक :
आवास आणि भूमी अधिकार संघठन
(हाऊसिंग एंड लैंड राईट्स नेटवर्क)
जी - १८/१, निजामुद्दीन पश्चिम, लोवर ग्राउंड फ्लोर,
नवी दिल्ली - ११००१३
फोन / फैक्स : ९१ - ११ - २४३५ - ८४९२
ई - मेल : info@hic-sarp वेबसाईट : www.hic-sarp.org

आणि

घर हक्क समिती (CRH) मुंबई बांद्रा (पूर्व)
बिस्मिल्हा बिल्डींग 'सी' विंग दुसरा मजला, रुम नंबर - १३
अहमद जकारिया नगर, बेहरामपाडा
मुंबई - ४०० ०५१
ई - मेल : crh.udaan@gmail.com
फोन : ०२२ - २६४७६७७१

मुद्रक :

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पान नंबर |
|---|---|---|
| १ | ओळख | १-४ |
| २ | उपयोगी आवासा करिता मानवाधिकाराचे तात्पर्य काय आहे. | ५-७ |
| ३ | जबरदस्तीने बेदखल करणे म्हणजे काय | ८-१० |
| ४ | जबरदस्तीने बेदखल करताना कोणते मानावाधिकार प्रभावित होत असतात | ११-१२ |
| ५ | जबरदस्तीने बेदखल केलेल्या परिस्थितीमध्ये आंतराष्ट्रीय कायद्याच्या अंतर्गत आपले काय अधिकार आहेत. | १३-१५ |
| ६ | जबरदस्तीने बेदखल केलेल्या परिस्थितीमध्ये भारतीय कायद्याच्या अंतर्गत आपले काय अधिकार आहेत. | १६-२१ |
| | १. भारतीय संविधान | १७ |
| | २. राष्ट्रीय धोरण | १८ |
| | ३. न्यायालयीन निर्णय | १९-२१ |
| ७ | जबरदस्तीने बेदखल केलेल्या परिस्थितीमध्ये महाराष्ट्रातील कायद्याच्या अंतर्गत आपले काय अधिकार आहेत. | २२-२८ |
| | १. मुंबईचा मास्टर प्लान | २३-२७ |
| | २. मुंबई विकास प्राधिकरण अधिनियम (एम.एम.आर.डी.ए) १९५६ | २७ |
| | ३. म्हाडा | २८ |
| ८ | बेदखलीच्या समस्यांमध्ये आंतराष्ट्रीय दिशा - निर्देश व मापदंड काय आहे, ज्याचे अनुपालन आवश्यक आहे. | २९-३४ |
| | १. बेदखलीच्या अगोदर | ३१ |
| | २. बेदखलीच्या वेळी | ३१ |
| | ३. बेदखलीच्या नंतर | ३२ |
| | ४. मुलांच्या अधिकारांच्या संरक्षणा करिता संयुक्त राष्ट्राचे दिशा - निर्देश | ३३ |
| | ५. महिलांच्या अधिकारांच्या संरक्षणाकरिता संयुक्त राष्ट्राचे दिशा - निर्देश | ३४ |

| | | |
|---|---|---|
| ९ | जबरदस्तीने बेदखल केलेल्या परिस्थितीमध्ये आपल्या करिता कोणते समाधान उपलब्ध आहे. | ३५-३७ |
| | १. योग्य व त्वरित मदत | ३६ |
| | २. नुकसान भरपाई व पुनर्वसन | ३६ |
| | ३. पुनर्वसन किंवा पुनर्स्थापना | ४७ |
| १० | जबरदस्तीने बेदखल करणाऱ्या परिस्थितीला रोखण्याकरिता / विरोध किंवा न्याय मिळवण्याकरिता उचलली जाऊ शकणारी पाऊले | ३८-४४ |
| | १. याचिका / जनहितवाद (पीआईएल) दाखल करने | ३९ |
| | २. मानवाधिकारांचे उलंघन व बेदखलकीचे दस्तावेज | ३९ |
| | ३. बेदखलकी व पुनर्वशनाशी संबंधित सूचनासाठी सूचनेचा अधिकार (आरटीआई) अपील दाखल करण्यासाठी | ४० |
| | ४. बेदखलकी असर आकलन | ४१ |
| | ५. सत्य शोधणे अभियान (फ्याकट फायडिंग) | ४२ |
| | ६. खाजदार आणि आमदारांवर दबाव टाकणे | ४२ |
| | ७. संविनय आज्ञा कार्यक्रम आयोजित करणे | ४२-४३ |
| | ८. पत्र लेखन पोस्ट कार्ड अभियान | ४४ |
| ११ | जबरदस्तीने बेदखलीच्या वेळी मानवाधिकारांचे उलंघन झाले असल्यास आपण कोणास संपर्क करु शकतो. | ४५-५२ |
| | १. उपयोगी जबाबदार सरकारी अधिकारी | ४७ |
| | २. मुंबई महानगर पालिका वॉर्ड ऑफीस | ४८ |
| | ३. मानवाधिकार संस्था | ४९ |
| | ४. राष्ट्रीय मानवाधिकार आयोग | ५० |
| | ५. मेडिया | ५१-५२ |
| १२ | निष्कर्ष | ५३-५४ |



# ओळख

संयुक्त राष्ट्राच्या लोकसंख्येच्या रिपोर्टानुसार २०११ वर्षाच्या मध्या पर्यंत भारताच्या शहरी मलीन वस्त्यांची लोकसंख्या १५.८ करोड अंकापर्यंत गेली आहे. मोठ्या महानगरांमध्ये जास्तीत - जास्त लोकसंख्या मलीन वस्त्यांमध्ये व अस्थाई घरांमध्ये राहत आहेत.

गेल्या दशकामध्ये जगभरात लोकांना जबरदस्तीने बेदखल करण्यात येण्याच्या प्रमाणात मोठी वाढ झाल्याचे दिसत आहे. व त्याचा पुरावा देखील राहिला आहे. ह्याच्यापाठी अनेक कारणे आहेत. यामध्ये ग्रामीण आणि शहरी दोन्ही क्षेत्रांमध्ये मोठी आधारभूत संरचना आणि विकास याची मोठी परियोजना सहभागी आहे. ज्याचा बांध निर्माण, खाणी व बंदरांची निर्मिती शहरांचा नवनिर्माण व विस्तार, नगर सौंदर्यीकरण, खेळ आणि इतर मोठ्या परियोजना अथवा औद्योगिक विकास यांचा सरळ संबंध आहे. ह्या तमाम मोठ्या परियोजना लागू करण्याकरिता शेत जमिनीचे अधिग्रहण केले जात आहे, अचल संपत्तीचे खरेदी-विक्री केली जात आहे. खाजगीकरणास बढावा दिला जात आहे. किंवा पर्यावरणाच्या संरक्षणाच्या योजना एकत्रित केल्या जात आहेत. ज्यामुळे सामान्य लोकांना किंवा वेगवेगळ्या समूहाना त्यांची घरे व पर्यावरणा पासून जबरदस्तीने बेदखल केले जात आहे. समुचित पुनर्स्थापनेच्या अभावामुळे लोकांच्या समोर आवासाचे संकट मोठे आहे. ग्रामीण भागातून शहराकडे येणाऱ्या लोकांची संख्या दिवसें दिवस वाढत आहे. आणि त्याचा परिणाम म्हणून त्यांच्या पारंपारिक अजीविकेला नुकसान पोहचत आहे.

आर्थिक रुपात कमजोर वर्गांना (ई डब्लू एस) किंवा कमी उत्पन्न वाल्या समुहांना (एलआईजी) करिता कमी मेहनत किंवा स्वस्त आवासाच्या योजनांच्या अभावामुळे दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी राष्ट्रीय शहरी आवासाच्या अंतर्गत २.४७ करोड पण अकराव्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी २००७ - २०१२ मध्ये २.७ करोड आवासाची एकजूट कमी असल्याचे अनुमान आहे. ज्यामध्ये ९९ टक्के आर्थिक उत्पन्न कमी असलेल्या वर्गाकरिता किंवा कमी उत्पन्नवाल्या समूहाशी संबंधित आहे. पंचवार्षिक योजनेचे (२००७-२०१२) साठी एकूण ४.७ करोड ग्रामीण आवासाच्या कमतरतेचा अभ्यास केला आहे. ज्यामध्ये ९० टक्के संख्या दारिद्र्य रेषेखाली (बिपीएल) मध्ये राहणाऱ्या परिवारांची सांगितली होती.

---

१. शहरी आवासावर आकराव्या पंचवार्षिक योजना (कार्यशील समूह) चा रिपोर्ट, आवास व शहरी गरीब उन्मुलन मंत्रालयात, भारत सरकार.

२. ग्रामीण आवासावर आकराव्या पंचवार्षिक योजना (कार्यशील समूह) चा रिपोर्ट, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार.

संयुक्त राष्ट्राच्या लोकसंख्येच्या रिपोर्टा नुसार २०११ वर्षा च्या मध्यापर्यंत भारताच्या शहरी मलीन वस्त्यांची लोकसंख्या १५.८४ करोड सांगितली गेली आहे. मोठ्या महानगरांमध्ये जास्तीत - जास्त लोकसंख्या मलीन वस्त्या व अस्थाई घरांमध्ये राहत आहेत.

वरील रिपोर्ट देशामध्ये आवसाच्या कमतरतेच्या नाजूक स्थितीला दर्शवत आहे. देशाची जास्तीत जास्त लोकसंख्या बिकट व अपर्याप्त परिस्थिती मध्ये अपुऱ्या सुविधा असलेली घरे व मलीन वस्त्यांमध्ये मजबूर होऊन राहत आहेत. नागरिक संस्था व सरकार या दोघांच्या निष्कर्षानुसार मुंबई महानगराची लगभग ६० टक्के आणि दिल्ली ची कमीत कमी ५० टक्के लोकसंख्या मलीन व अस्थाई वस्त्यांमध्ये राहत आहे. वरील दोन्ही महानगरांची जी लोकसंख्या आहे ती कमी सुविधा असलेल्या आवासांमध्ये राहत आहे. तरी या आकड्यांना त्यामध्ये सामील करुन घेतले तर ही संख्या अधिक वाढू शकते. ही स्थिती हेच दर्शावत आहे, कि देशाच्या शहरी लोकसंख्येचा मोठा हिस्सा असणाऱ्या जवळ उपयुक्त आवास आणि मुलभूत सुविधांची अत्यंत कमतरता आहे. किंवा ह्या सुविधा पर्यंत ते लोक पोहोचू शकलेच नाहीत. मलीन वस्त्यांची जमीन उपयोगाची अनिश्चितेच्या कारणामुळे आणि दुसऱ्या बाजुने मलीन वस्त्यांची मूक्त विश्व - स्तरीय शहरांच्या संरचनासाठी लगातार विकासाचे नमुने (मॉडेल) तयार केले जात आहेत. या विकासाच्या पद्धतीमुळे प्रत्येक वेळा त्या ४लोकांना, ज्या मलीन वस्त्या व अस्थाई जमीनिवर रहावे लागत आहे. त्याच्या मनामध्ये जबरदस्तीने बेदखल होण्याची आणि आपल्या घरांना तोडून टाकण्याची भिती सतावत आहे.

योग्य भांडवलाची आवासा करिता कमतरता त्याचबरोबर मुलभूत सेवांची कमतरता किंवा जमिनीच्या उपयोगाच्या वेळी हद्दीवर कायदे विषयक सुरक्षांची कमतरता हे भारतात आवासांच्या संबंधित नाजूक मुद्दे आहेत. राष्ट्रीय शहरी आवास व पर्यावास धोरण २००७ मध्ये पण हे स्वीकार केले गेले आहे कि ‘मलीन वस्त्यांमध्ये आवासाच्या संरचनेचा स्तर अत्याधिक दयनीय आहे. जमिन उपयोगाच्या कालावधीची कायदेविषयक असुरक्षा हे एक महत्वपूर्ण कारण आहे.“

---

३. आवास व शहरी गरीब उन्मुलन मंत्रालय (एमएचयुपीए) मलीन वस्तीचे आकडे / जनगणना वर कमेटीचा रिपोर्ट, राष्ट्रीय निर्माण संगठन, २०१०

४. राष्ट्रीय शहरी आवास व पर्यावास धोरण, २००७. पैरा १.१५

# शहरी अधिकार

'शहरी अधिकारा' करिता अंदोलन शहरांमध्ये राहणाऱ्या प्रत्येक व्यक्ती आणि विशेषता मागास आणि वंचित वर्गा करिता उत्तम पोहचेल व संधी सुनिश्चित करण्यासाठी सामाजिक समूह आणि नागरी संस्था सारख्या संघटनांचे रचनात्मक प्रयत्न फलस्वरुप पुढे आले, जगभरात झालेली सामाजिक अंदोलने व संघटनांनी शहरी अधिकारांवर एक वैश्विक दस्तावेज विकसित करण्यासाठी सामुहिक रुपांमध्ये कार्य केले. जसे युएनईएससीओ (युनायटेड नेशन्स एज्यूकेशनल, सांइटीफिक एंड कल्चरल ऑरगनाइजेशन) आणि अनेक संस्थांबरोबर ही युएन (संयुक्त राष्ट्रा) चे पण समर्थन प्राप्त झाले दस्तावेजा मध्ये जीवन निर्वाह चा आधारभूत सिध्दांतात, लोकतंत्र, समानता आणि सामाजिक न्यायामध्ये शहरांचे एक समान उपयोगधीकाराला 'शहरी अधिकाराच्या' रुपात परिभाषित केले गेले आहे. हे शहरातील लोक आणि शहरातील असाह्य किंवा वंचित समुहाचा एक सामुहिक अधिकार आहे. जे त्यांना असे कार्य आणि संघटनांची वैधता प्रदान करत आहे. जे त्यांच्या प्रचलित रिती - रिवाजा बरोबर ही स्वतंत्र दृढ आत्मनिर्णया संबंधी अधिकारांचा पूर्ण उपयोग आणि एक यथोचित आवासाच्या स्तरावर स्तर प्राप्तीच्या उद्देशांवर आधारित असेल. अशा प्रकारे 'शहरी अधिकार' शहरातील विशेष सर्व निवासांच्या शहराद्वारे प्रदत्त सर्व फायदे / संधी मध्ये समान भागेदारीचा अधिकार सोबत शहरी योजना व विकास संरचना मध्ये समान रुपानुसार भागेदारीचा अधिकार आहे.

शहरी अधिकारांचे है वैश्विक अंदोलन वेगवेगळ्या शहरांचे शहर प्रमुखा पर्यंत पण पोहचले आहे. कारण कि ते आपल्या - आपल्या शहरांमध्ये मानवाधिकाराला प्रोत्साहन देण्याकरिता ह्या वैश्विक दस्तावेजाला स्वीकार करतील. भारत सरकारने पण शहरी अधिकाराला मान्यता व प्रोत्साहन देण्याचा दिशेने कार्य केले पाहिजे. किंवा आपल्या सिद्धांताला सर्व स्थानिक शहरांच्या विकास परियोजनांमध्ये सहभागी केले पाहिजे.

२




# उपयुक्त आवासा करिता मानवाधीकाराचे तात्पर्य काय आहे ?

जगातील अधिकतर लोकसंख्या अलग-अलग आकार-प्रकार च्या घरांमध्ये राहत आहे. जगातील लोकसंख्येच्या कमीत - कमी आर्ध्या लोकसंख्येला उपयोगी आवासा करिता निर्धारित गरजे नुसार मापदंडानुरुप आवासाच्या सुविधांचा लाभ मिळत नाही. आंतरराष्ट्रीय मानवाधिकाराचा कायदा किंवा त्याच्या घोषणे करिता एक भाकीत सुनिश्चित केले गेले आहे की, आवास मात्र एक छत आणि चार भिंतिचा एक भौतिक ढांचा भर सुधा नाही. परंतु ती एक व्यापक कल्पना आहे. ज्यामध्ये अनेक तत्व आणि अन्य वस्तूचा समावेश होत असतो जो एक सुरक्षित आणि पक्या आवासाच्या ठिकाणा करिता गजेचा आहे. त्याच्या व्यतिरिक्त उपयोगी आवास फक्त एक स्वैच्छिक लक्ष्य नसून हा सर्व माणसांचा एक महत्वाचा अधिकार आहे. १९४८ सालच्या घोषणा पत्रा मार्फत हे सूचित केले गेले आहे की, जो उपयोगी आवासाच्या अधिकाराला जीवन जगण्याच्या उपयोगी स्तराकरिता एका विभिन्न घटकाच्या रुपात मान्यता देत आहे.

मानवाधिकार वैश्विक अधिकार घोषणा पत्र (युडीएचाआर) अनुच्छेद २५.१ असे सांगतो कि प्रत्येक व्यक्तीला एक स्थिर जीवन जगण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. ज्यामध्ये अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्याची देखभाल व आवश्यक त्या सर्व सामाजिक सेवांचा समावेश आहे. त्याचबरोबर बेरोजगारी, आजारपण, अपंगत्व, विधवा होणे, वृधावस्था मध्य किंवा आजीविका ची अशी परिस्थिती निर्माण झाल्यावर जी व्यक्तीच्या नियंत्रनाच्या बाहेर गेली असेल, ह्या सर्व परिस्थिती मध्ये सुधा त्यांना सुरक्षिततेचा अधिकार प्राप्त होत असतो.

मानवाधिकारांच्या वैश्विक घोषणा पत्रामध्ये स्थापित तरतुदींच्या आधारावर उपयोगी आवासाच्या अधिकाराला आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकारावर आयोजित आंतराष्ट्रीय संधी (आईसीईएसआर) १९६६ द्वारा अधिक सुस्पष्ट व विस्तारित केले गेले आहे. ह्या उपयोगी आवासाच्या अधिकाराला अनुच्छेद ११.१ वेगळ्या प्रकारे व्यक्त करत आहे.

चालू नियोजनाशी संबंधीत सर्व राजकीय पक्ष प्रत्येक व्यक्तीला जीवन जगण्यासाठी उपयोगी स्तरांचा अधिकार प्रधान करत आहे. स्वत: त्याच्या करीता, किंवा त्याच्या परीवारा करिता ह्या अधिकारामध्ये उपयोगी अन्न, वस्त्र, निवारा किंवा जगण्याच्या परिस्थितीमध्ये सतत सुधारणांचा समावेश आहे.

उपयुक्त आवासावर संयुक्त राष्ट्राच्या (यु.एन.) विशेष प्रतीवेदकाने उपयुक्त आवासासाच्या मानवाधीकाराला परिभाषित करताना लिहिले आहे कि,

**"प्रत्येक महिला, पुरुष व तरुण यांना एक सुरुक्षित घर प्राप्त करण्याचा आणि त्याला सुस्थिती मध्ये कायम सांभाळून ठेवण्याचा अधिकार मिळाला आहे. कारण कि ते आपल्या समुदाया मध्ये शांती आणि सन्मानाने जीवन जगू शकतील."**

उपयोगी आवासाचा मानवाधिकार सन्मानपूर्वक जीवन जगण्याच्या अनुभूतीशी जोडला गेला आहे. तसेच अन्य सर्व मानावाधिकार जसे अन्नाचा अधिकार, कामाचा अधिकार, आरोग्य, पाणी, जमिनीचा अधिकार तसेच घर व परिवारातील सदस्यांच्या सुरक्षा अधिकाराशी सरळ जोडला आहे.

---

१ उपयोगी आवासावर विशेष प्रतिवेदक चा रिपोर्ट, मिलून कोठारी, ई/सीएन.४/२००६/४१, २१ मार्च २००६

# ३



पटेल नगरी बांद्रा (पश्चिम)

## जबरदस्तीने बेदखल करणे म्हणजे काय ?

आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधाकारावर संयुक्त राष्ट्र समितीने (सी.ई.एस.सी.आर.) जबरदस्तीने बेदखलीला अशा प्रकारे स्पष्ट केले गेले आहे.

**"व्यक्ती, परिवार किंवा समुदायांना त्यांची घरे किंवा जमीन ज्यामध्ये ते ताबेदार आहेत. अशा ठिकाणी त्यांच्या इच्छे विरुद्ध कायदेशीर सुरक्षा व अन्य सुरक्षेचे उचित आवस्थाविना किंवा उचित प्रवदाना शिवाय स्थानी व अस्थायी स्वरुपात हाटवणे."**

विकास आधारित बेदखली आणि विस्थापनावर संयुक्त राष्ट्र समितीचे मौलिक सिध्दांत व दिशा-निर्देश (२००७)[२] जबरदस्तीने केलेल्या बेदखलीला अशा प्रकारे स्पष्ट करत आहे.

**"अशा कारवाया किंवा चुका ज्यामध्ये व्यक्ती, समुह किंवा समुदायाला त्यांची घरे जमीन किंवा सामान्य संपत्ती, संसाधन ज्यामध्ये ते समाविष्ट होते. किंवा ज्यावर ते अवलंबून होते. जबरदस्ती किंवा अनिच्छुक रित्या विस्थापन जबरदस्तीच्या बेदखलीमध्ये सहभागी आहे. अशा प्रकारच्या कारवाया कोणत्याही व्यक्ती, समूह किंवा समुदायाच्या कार्यक्षमतेला कमी करत आहे. ज्यावेळी इतर विशेष प्रकारच्या आवास आणि वातारनामध्ये कोणत्याही कायद्याच्या तरतुदी आणि संरक्षण बिना राहण्यास मजबूर केले जात आहे."**

ह्याच्या व्यतिरिक्त दिल्ली उच्च न्यायालयाने २०१० साली दोन निर्णयामध्ये हे स्वीकार करताना सांगितले कि,

**जबरदस्तीने बेदखल केल्यामुळे मानवाधिकाराचे उल्लंघन होत आले आहे आणि सतत चालू देखील आहे.**

---

१. सामान्य टिपणी ७ उपयोगी आवासाचा अधिकार (अनुबंध का अनुच्छेद ११.१) जबरदस्तीने बेदखलकी, आर्थिक, सामाजिक किंवा सांस्कृतिस संयुक्त राष्ट्राची समिती, १९९७

२. उपयोग आवासावर संयुक्त राष्ट्रसंघाचे विशेष प्रतिवेदक द्वारा प्रस्तुत रिपोर्ट ए / एच आर सी / ४ / १८ फेब्रुवारी २००७

Http: //www2.ohchr.org/english/issues/housing/docs/guidelines_en.pdf.translations in other languages available at :http://www.ohchr.org/EN/issues/Housing/pages/ForcedEvictions.aspx and www.hic.sarp.org.

“

मलीन वस्त्या किंवा झोपडपट्टी वाशीयांशी संबंधित जबरदस्तीने बेदखल करण्यापूर्वी घेतले गेलेले न्यायालयीन निर्णयाचे अनुभव व उदाहरण दिल्ली व मुंबई  शहरामध्ये अनेक आहेत. असाह्य किंवा चिंतीत नागरिकांना जबरदस्तीने त्यांच्या घरामधून बेदखल करुन त्यांना बरबाद केले गेल. आणि त्यावर राज्य सरकारचे लांब हात कायद्याच्या भाषेत अत्याधिक समस्यांची व्याख्या करत आहेत. संविधानिक तरतुदींचा आणि  सुविधांचा आसरा घेत आहेत. ज्यामध्ये अवैध कब्जा / प्रभावित व्यक्तींना त्यांच्या जागेवरुन हटवण्याची कारवाई कायद्याने योग्य आहे असे ठरवले जाते. पण शहरांमध्ये इतर निर्मानाना किंवा नियमान विरुध काबीज लोकांना नियमित आणि सुरक्षित केले जात आहे.

”

१. पी. के. कौल विरुद्ध इस्टेट ऑफिसर व अन्य रिट पिटीशन (सी) नं. १५२३९ / २००४ व सी एम नं. ११०११ / २००४ दिल्ली उच्च न्यायालय ३० नोव्हेंबर २०१०

# ४



पटेल नगरी बांद्रा (पश्चिम)

# जबरदस्तीने बेदखल करताना कोणते मानवाधिकार प्रभावित होत असतात ?

जबरदस्तीने बेदखल केल्यामुळे फक्त उपयोगी आवासाच्या मानवाधिकारांचेच उलंघन होते असे नाही. तर बहुतेक अन्य आंतराष्ट्रीय मानवी मानवाधीकारांचे देखील उल्लंघन होत असते.

त्यात पुढील मानवाधिकारांचे उल्लंघन होते.

- व्यक्तीची सुरक्षा व घराच्या सुरक्षेचा मानवाधिकार
- आरोग्याचा मानावाधिकार
- अन्न  मिळवण्याचा मानवाधिकार
- पाण्याचा मानवाधिकार
- काम धंदा / अजीविकेचा मानवाधिकार
- शिक्षणाचा मानवाधिकार
- क्रूरता अमानवियता किंवा अपमानाच्या मुक्तीचा मानवाधिकार
- आंदोलन स्वातंत्र्याचा मानवाधिकार
- पूर्व सूचनांचा मानवाधिकार
- आत्म अभिव्यक्ति व सहभागाचा मानवाधिकार
- पुनर्वसानाचा मानवाधिकार

संयुक्त राष्ट्र मानवाधिकार आयोग प्रस्ताव, १९९३ / ७७ मध्ये सुनिश्चित केले गेले आहे. की, जबरदस्तीने बेदखल उपयोगी आवासाचे प्राथमिक दृष्ट्या उल्लंघन आहे.

# जबरदस्तीने बेदखल केलेल्या परिस्थितिमध्ये आंतरराष्ट्रीय कायद्याच्या अंतर्गत आपले काय अधिकार आहेत ?

संयुक्त राष्ट्राशी संबंधीत आंतरराष्ट्रीय मानवाधिकारांच्या अनेक पैलू वर भारत सरकारने आपली सहमती दर्शवली आहे. अर्थात हे कायदे भारतात प्रभावी आहे किंवा त्यांना भारतात लागू करण्याकरिता भारत सरकार व दिल्ली सरकार प्रयत्नात आहे.

**उपयोगी आवासा करिता मानवधिकाराशी संविंधित विशेष प्रावधान आहे.**

१. सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक अधिकारावर आंतरराष्ट्रीय संकल्प (१९६६)[१]

अनुच्छेद ११.[१]

२. नागरिक व राजकीय अधिकारावर आंतरराष्ट्रीय संकल्प पत्र (१९६६)[२]

अनुच्छेद २.३ व १७

३. सर्व प्रकारचे नकस्लीय भेदभावावर उन्मूलन वर आंतरराष्ट्रीय संमेलन (१९६५)[३]

अनुच्छेद ५

४. बाल अधिकारा वर संमेलन (१९८९)[४]

अनुच्छेद २७

५. सर्व प्रवाशी मजदूर व त्यांच्या परिवारातील सदस्यांच्या अधिकाराचे संरक्षणावर आंतरराष्ट्रीय संमेलन (१९९०)[५]

अनुच्छेद ४३.१

---

१. आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकारावर आंतरराष्ट्रीय संकल्प, संयुक्त राष्ट्र महासभा १६ डिसेंबर १९६६
वेबसाईट - http://www2.ohchr.org/english/law/cescr.htm

२. नागरिक व राजकीय अधिकारावर आंतरराष्ट्रीय संकल्प, संयुक्त राष्ट्र महासभा १६ डिसेंबर १९६६
वेबसाईट :- http://www2.ohchr.org/english/law/ccpr.htm

३. सर्व प्रकारचे नकस्लीय भेदभावावर उन्मूलन वर आंतरराष्ट्रीय संमेलन, संयुक्त राष्ट्र महासभा, २१ डिसेंबर १९६५
वेबसाईट : http://www2.ohchr.org/english/law/cerd/.htm

४. बाल अधिकारावर संमेलन, संयुक्त राष्ट्र महासभा, २० नोव्हेंबर १९८९
वेबसाईट : http://www2.ohchr.org/english/law/crc/htm

५. सर्व प्रवाशी मजदूर व त्यांच्या परिवारातील सदस्यांच्या अधिकारांच्या संरक्षणावर आंतरराष्ट्रीय संमेलन संयुक्त राष्ट्र महासभा १८, डिसेंबर १९९०
वेबसाईट : http://www2.ohchr.org/english/law/cmw.htm

६. शरणार्थीयांच्या सामाजिक स्थितीशी संबंधित संमेलन (१९५१)[६]
अनुच्छेद २१

७. अपंग लोकांच्या अधिकारवर संमेलन (२००७)[७]
अनुच्छेद २८

आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकारावर आंतराष्ट्रीय संकल्प पत्र १९६६, निर्धारित करत आहे. (अनुच्छेद ११.१)

**"हा संकल्प घेणारी सर्व राज्यकीय सत्ता प्रत्येक व्यक्तीला स्वतः त्याच्या करिता आणि त्याच्या परिवाराच्या जीवनाकरिता उपयोगी स्थराची मान्यता प्रधान करत आहे. ज्यामध्ये उपयोगी अन्न, वस्त्र व निवारा किंवा जगण्याच्या परिस्थितीमध्ये कायमच्या सुधारणाचा सहभाग राज्य सत्ता ह्या अधिकारांची अनुभूतीला सुनिश्चित करण्याकरिता किंवा त्याच्या प्रभावाला मुक्त सहमती वर आधारित आंतरराष्ट्रीय मद्दतीमध्ये आवश्यक महत्व देण्याकरिता योग्य पाउले उचलतील."**

---

६. शरणार्थीयांच्या जीवन स्तराशी संबंधित संमेलन, संयुक्त राष्ट्र महासभा, २२ एप्रिल, १९५४.
वेबसाईट : http://www2.ohchr.org/english/law/refugees.htm

७. अपंग / असाह्य लोकांच्या अधिकारावर संमेलन, संयुक्त राष्ट्र महासभा, ३ मे, २००८
वेबसाईट : http://www2.ohchr.org/english/law/disabilities- conevntion.htm#

# जबरदस्तीने बेदखल केलेल्या परिस्थितीमध्ये भारतीय कायद्यांच्या अंतर्गत आपले काय अधिकार आहेत ?

## १. भारतीय संविधान

भारतीय संविधानात स्वातंत्रता, बंधुभाव, समानता आणि न्याय हे सिद्धांत स्थापित आहे. तरीही आवासच्या अधिकाराला मुलभूत अधिकाराच्या रुपात स्पष्ट नाही केले गेले आहे. हे संविधानामध्ये प्रदत्त मुलभूत अधिकार व निर्देशक सिद्धांताच्यामध्ये गुंतले गेले आहे.

भारताच्या संविधानाद्वारे प्रदत्त मौलिक अधिकार जे उपयोगी आवासा करिता मानवाधिकाराचे संरक्षण आणि पूर्ण सुरक्षाशी जोडले आहे. काही प्रमुख अधिकार पुढील प्रमाणे :-

१. **अनुच्छेद १९ (१) (इ)** प्रत्येक नागरिकाला भारताच्या प्रत्येक राज्याच्या क्षेत्रात कोणत्याही भागात निवास करण्याचा व त्या ठिकाणी बसण्याचा अधिकार.

२. **अनुच्छेद १९ (१) (डी)** प्रत्येक भारतीय नागरिकाला संपुर्ण भारतात कोठे ही मुक्त आचरण करण्याचा अधिकार.

३. **अनुच्छेद २१** - कायद्याद्वारे कार्य पद्धतीच्या अनुसार सुरक्षा व व्यक्तीगत स्वातंत्र्याचा अधिकार.

४. **अनुच्छेद (१९) (१) (जी)** प्रत्येक नागरिकाला कोणताही व्यवसाय करण्याचा जीवन जगण्याकरिता कोणतेही कार्य, व्यापार किंवा व्यवसाय करण्याच अधिकार.

५. **अनुच्छेद १४** - भारतीय राज्य क्षेत्रांच्या अंतर्गत प्रत्येक नागरिकाला कायद्याद्वारे समान व्यवहार कायदे विषयक संरक्षणाचा अधिकार.

६. **अनुच्छेद १५ (१)** प्रत्येक नागरिकाला लिंग, धर्म, जाती, वर्ण, किंवा जन्म स्थानाच्या आधारावर कोणत्याही भेदभावाच्या विरुद्ध संरक्षणाचा अधिकार.

७. **अनुच्छेद १६** - प्रत्येक नागरिकाला सार्वजनिक रोजगारांच्या विषयी समान संधीचा अधिकार.

संविधान निर्देशक - सिद्धांताला प्रदत्त करत आहे. ज्याच्या अनुसार आपण धोरण निर्माण करत असतो. ते पुढील प्रकारे

१. **अनुच्छेद (३९) १** पुरुष आणि महिला दोघांकरिता जीवन निर्वाहच्या मुलभूत साधनावर एक समान अधिकार सुरक्षित करण्याकरिता राज्याचे धोरण निर्देशित असावे.

२. **अनुच्छेद ४२** राज्याद्वारे कामाची न्याय संगत व मानवी परिस्थिती सुरक्षित करने व मातृत्वाच्या जोपासना करिता तरतूद केली जावी.

३. **अनुच्छेद ४७** पोषणाचा स्तर व जीवन स्तर उंचाविण्याकरिता किंवा जन स्वास्थाच्या सुधारणे करिता राज्याचे कर्तव्य.

## २. राष्ट्रीय धोरण

अनेक राष्ट्रीय धोरणे पण सरकार द्वारे उन्नत घर व आवास निर्माण करने गरजेचे मानत आहे.

### क) राष्ट्रीय शहरी आवास व पर्यावास धोरण, २००७

भारताची राष्ट्रीय शहरी आवास व पर्यावास धोरण, २००७ च्या मुख्य भावना अशा प्रकारे आहे.

समाजातील वंचित वर्गाकरिता जसे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मागासवर्गीय, अल्पसंख्यांक व शहरी गरीबांना विशेष महत्व देऊन सर्वांकरिता स्वस्त आवासाची तरतूद आहे.[१] हे धोरण स्वस्त किंमतीवर जमीन, आवास व सेवा सुनिश्चित करण्याचा प्रयत्न करत आहे. हे शहरी सामान्य लोकांना त्यांच्या राहत्या ठिकाणीच व काम करण्याच्या ठिकाणाच्या जवळ पास ही त्या लोकांच्या आवासाची सोय करण्याची प्रथम मागणी लोकांची असते. लोकांचे पुनर्वसन ज्या ठिकाणी होणार आहे. त्या ठिकाणी लोक सहजरित्या पोहचू शकतील. महिलांच्या त्या ठिकाणी कोणत्या समस्या आहेत. त्या सर्व समस्यांचा त्यात सहभाग केला पाहिजे. आवासचे धोरण व कार्य योजनांमध्ये त्यांचा सहभाग करुन घेणे गरजेचे आहे. अशी करण्यात आली आहे हे धोरण मुलभूत सुविधांवर भर देते ज्या ठिकाणी पुनर्वसन केले जाणार त्या ठिकाणी सर्व सुविधा असने गरजेचे आहे. महिला संचालीत घरांमध्ये, एकल महिला, कामकरणाऱ्या महिला, कठीण आवासाच्या परिस्थितीमध्ये राहणाऱ्या स्त्रिया यांच्या विशेष गरजांवर देखील हे धोरण जोर देते आहे.[२]

### ख) राष्ट्रीय पुनर्वासन व पुनर्स्थापन धोरण, २००७

हे धोरण जमिनीचा मालक किंवा अन्य जसे भाडोत्री, भूमिहीन, कृषी व गैर कृषी मजदूर, दस्ताकार व अन्य अशा लोकांच्या हिताचे संरक्षण करत आहे.

ज्यांची उपजीविका त्या जमिनीवर निर्भर आहे. जो भूमी विकासावर गतीविधीसाठी सरकारद्वारे नियुक्त केली गेली आहे.[३]

प्रभावित परिवारांना जे लाभ प्रदान केले जातात, त्याच्यामध्ये जमिनीच्या बदल्यात जमीन प्रभावित

१. राष्ट्रीय शहरी आवास व पर्यावास धोरण, २००७ शहरी गरिबांना विशेष महत्व देऊन सर्वांसाठी स्वस्त आवासाचे लक्ष्य निर्धारित, प्रेस सूचना ब्युरो, भारत सरकार, ११ ऑक्टोबर, २००७ उपलब्ध
वेबसाईट : http://pib.nic.in/newsite/erelease.aspx?relid=33884

२. राष्ट्रीय शहरी आवास व पर्यावास धोरण, २००७ आवास व शहरी गरिबी उन्मूलन मंत्रालय, भारत सरकार.
वेबसाईट : http ://mhupa.gov.in/policies/duepa/HousingPolicy2007.pdf

३. पुनर्स्थापना व पुनर्वास धोरण किंवा भूमिहीन अधिग्रहण विषयक विधिक मानक, प्रेस सूचना ब्युरो, भारत सरकार, १२ ऑक्टोबर २००७

परिवारातील कमीत - कमी एका सदस्याला रोजगार चांगले प्रशिक्षण व कौशल्य वृद्धी, प्रभावित परिवारातील योग्य व्यक्तिला शिक्षण घेण्याकरिता छात्रवृती, आवासाच्या सुविधा, ज्यामध्ये प्रभावित भूमिहीन परिवाराला घर देण्याचा सहभाग आहे.[४]

**ग) राष्ट्रीय मलीन वस्त्यांचे धोरण दस्तावेज, २००१**

भारतात आतापर्यंत कोणतीही आधिकारिक मलीन वस्त्यांकरीता धोरण नाहीत. फक्त एक रुपरेखा अस्तित्वात आहे. ज्यामध्ये पुनार्वासाशी संबंधित काही प्रावधान निहित केले गेले आहेत. राष्ट्रीय मलीन वस्त्यांच्या रुपरेखामध्ये सहभागी काही प्रावधान पुढील प्रकारे आहेत.

- राज्य / शहरी स्थानिक निकायी (युएलबी) ला हाटवून टाकताना कोणताही निर्णय घेण्यापूर्वी त्याचे विकल्प शोधले पाहिजे.
- आजिविका कमी प्रभावित असावी. ह्या करिता पुनर्स्थापनेसाठी नियोजित ठिकाणाचे आंतर कमी असायला पाहिजे.
- ठिकाणा विषयी रहिवाशांना वैकल्पिक ठिकाण आणि जिथे व्यावहारिक असेल, ठिकाण निवडण्याचा अधिकार व वैकल्पिक पुनर्वसन राशी प्रदान करण्याचे प्रावधान असेल.
- सर्व पुनर्वसन ठिकाणासाठी गरजेच्या सुविधा सोप्या असाव्यात किंवा बसासत पूर्व वाहतुकीची तरतूद असायला पाहिजे.
- प्रभावित लोकांची अजीविकेची पूर्णता क्षतीपुर्ती एका नियमित कालावधीच्या आतमध्ये केली गेली पाहिजे.
- कोणत्याही पुनर्वसन प्रक्रियामध्ये योजना बनवण्याकरिता व निर्णय घेताना प्राथमिक दावेदार विशेष महिलांची भूमिका आवश्यक असायला पाहिजे.
- कोणतीही शहरी विकास परियोजना जी समुदायाच्या इच्छेच्या विरुद्ध पुनर्वसनाच्या बाजूने वाढत आहे. त्या परियोजनांना पुनर्वसन व पुनर्स्थापना किंमत भरण्याची तरतूद केली पाहिजे.
- स्थळ परिवर्तन व कठीण प्रसंगी विशेषकर प्रतिकूल पावसाच्या मौसमात काळजीपूर्वक निर्धारित वेळ कमी करायला पाहिजे.

---

वेबसाईट : http://pib.nic.in/newsite/erelease.aspx?relid=31832

४. राष्ट्रीय पुनर्स्थापना व पुनर्वास धोरण, २००७ ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, ३१ ऑक्टोबर २००७

वेबसाईट : http://www.dgde.gov.in/sites/default/files/acquisition/NRRP2007.pdf

धोरण है सुनिश्चित करण्याचा प्रयत्न करत आहे. कोणताही फंड व्यावसायिकांना हाटवून टाकण्याचा किंवा स्थळ परिवर्तन केले जाण्यापूर्वीच पूर्व सूचना दिली गेली पाहिजे. धोरण स्पष्ट सांगते कि,

> गैर निर्धारित ठिकाणी फंड खर्च झालेल्य परिस्थितीमध्ये कमीत - कमी काही तासांच्या आत पूर्व फंड व्यावसायिकांना सूचित केले पाहिजे, कारण कि त्याच्यामुळे (महिला-पुरुष दोघांना) काबीज केलेल्या ठिकानाला खाली करण्यास वेळ मिळू शकेल स्थळ परिवर्तनाच्या स्थितीमध्ये पंजीकृत फंड व्यावसायिकांना समुचित वचन पुर्ती किंवा नवीन फंड स्थळाच्या आवंटन हेतू पंजीकृत केले गेले पाहिजे.

## ३. न्यायालयीन निर्णय

### क) भारताच्या सर्वोच न्यायालयाचे निर्णय

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने काही आपल्या निर्णयामध्ये व्यवस्था प्रदान केली आहे की, उपयोगी आवासाचा अधिकार मुख्य मानवाधिकार आहे. जो संविधानाच्या अनुच्छेद - २१ द्वारे निर्धारित जगण्याचा अधिकाराशी संरक्षित आहे. (कोणतीही व्यक्ती कायद्याद्वारे स्थापित कार्य व्यवहाराच्या अनुसार अन्यथा आपले जीवन किंवा खाजगी स्वतंत्रता पासून वंचित राहणार नाही.) असे भरपूर महत्वपुर्ण न्यायालयीन निर्णय आले आहेत. ज्यामध्ये निवासाचा अधिकार व जगण्याचा अधिकारामध्ये स्पष्ट संबंध मानाला गेला आहे. जसे कि अनुच्छेद - २१ मध्ये स्पष्ट केले गेले आहे.

---

५. शहरी फंड व्यावसायिकांवर राष्ट्रीय धोरण, २००९, पैरा ५.१
वेबसाईट : http://mhupa.gov.in/policies/StreetPolicy09.pdf

६. उत्तर प्रदेश आवास व विकास परिषद विरुद्ध फ्रेंड्स कोऑपरेटीव हौसिंग सोसायटी ली. चमेली सिंह व अन्य विरुद्ध उत्तर प्रदेश सरकार [(१९६६)२ एससीसी ५४९ १३२] फ्रांसिस कोराली विरुद्ध युनियन टेरीटरी दिल्ली (एआईआर १९८१ एससी ७४६, ७५३) शांती स्टार बिल्डर विरुद्ध नारायण खिमा लाल टोटमी [(१९९०)१ एससीसी ५२०] ओल्गा तेलीज विरुद्ध बॉम्बे नगर निगम [(१९८५) ३ एससीसी ५४५] मधु किश्वर विरुद्ध बिहार सरकार [(१९९६) ५ एससीसी १२५] भारताची ग्रामोफोन कंपनी विरुद्ध बी बी पांडे [(१९८४ (२) एससीसी ५३४)] पियुसीएल विरुद्ध भारतीय संघ [(१९९७ (३) एससीसी ७३३)] सी ईआरसी विरुद्ध भारतीय संघ [(१९९५ (३) एससीसी ४२)]

---

चमेली सिंह व इतर विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य (१९६६) च्या एका वादात न्यायालयाने जगण्याचा अधिकारावर स्पष्ट मत व्यक्त केले आहे.

**"कोणत्याही सभ्य समाजात पूर्णपणे प्रदत्त जगण्याचा अधिककाराच्या अंतर्गत जेवण, पाणी, सुखद पर्यावरण, शिक्षण, आरोग्य, सुरक्षा आणि निवासाच्या अधिकाराचा समावेश आहे. हे सर्व कोणत्याही सभ्य समाजात मान्य मुलभूत अधिकार आहेत. सर्व प्रकारचे नागरिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक अधिकार मानवाधिकारांच्या सार्वभौम घोषणा पत्रामध्ये व संम्मेलनामध्ये प्रस्थापित आहे. अन्यथा भारतीय संविधानाच्या अंतर्गत ह्या सर्व मुलभूत अधिकार बिना 'जगण्याचा अधिकारावर' अंमल नाही होऊ शकत."** ,

'आश्रय व उपयोगी निवासाच्या' अधिकारांना पण न्यायालयाचा निर्णय स्पष्ट रुपात परिभाषित करत असतो. तो पुढील प्रकारे

मानसाकरिता आश्रय त्याच्या अंतर्गत किंवा विलीन स्वतःच्या जीवनाच्या आपारीत संपत्तीचे संरक्षण मात्र मिळत नाही. हे एक घर असते. जिथे त्याच्या जवळ शाररीक, बौद्धिक व आध्यात्मिक रुपात पुढे होण्यास सोपा मार्ग मिळतो. अशा प्रकारे आश्रय च्या अधिकारामध्ये राहण्याचे पर्याप्त स्थान, सुरक्षित व सुंदर बनावट, स्वच्छ व सुखद परिवेश, समुचित प्रकाश, शुद्ध हवा आणि पाणी, वीज, सफाई किंवा अन्य नागरी सुविधा जसे रस्ते इत्यादीं सहभाग आहे. कारण कि त्यांना आपल्या दैनिक व्यवहारामध्ये सहज पोहच सुनिश्चित होऊ शकते. अशा प्रकारे निवासाच्या अधिकाराशी अभिप्राय कोणालाही डोक्यावर मात्र एक छत मिळेपर्यंत सीमित नसून सर्व प्रकारची बुनियादी संरचना सारखी आहे. जो माणसासारखे जगण्याचा व विकास करण्याकरिता समर्थ बनवायला जरुरी होईल.

## बी. दिल्ली उच्च न्यायालयाचे निर्णय[८]

सुदाम सिंह व अन्य विरुद्ध दिल्ली सरकार व इतर (२०१०)[९] च्या एका वादामध्ये दिल्ली उच्च न्यायालय स्पष्ट रुपात निर्धारित करत आहे. कि बेदखल समुदायाचा पुनर्वास.

७. चमेली सिंह व इतर विरुद्ध उत्तर प्रदेश सरकार [(१९९६) २ एससीसी ५४९]

८. हौसिंग आणि लेन्ड राईट्स नेटवर्क (एचएलआरएन) द्वारे प्रकाशित दिल्ली उच्च न्यायालयाचे निर्णयाची कॉमेंट्री. फेब्रुवारी २०१३

९. सुदाम सिंह व अन्य विरुद्ध दिल्ली सरकार व इतर, रिट याचिका (सी.नं. ८९०४ /२००९, ७७३५ / २००७ / ७३१७ / २००९ व ९२४६ / २००९ दिल्ली उच्च न्यायालय, ११ फेब्रुवारी २०१०

**मानवाधिकाराचे संरक्षण करने राज्याचे कर्तव्य आहे.**

२३. याचिकाकर्त्यांना पुनर्स्थापनामध्ये फायद्यापासून वंचित त्यांना संविधानाच्या अनुच्छेद - २१ च्या अंतर्गत प्राप्त निवासाच्या अधिकाराचे उल्लंघन होत आहे, ह्या परिस्थितीमध्ये त्यांच्या झोपड्याचे पुनर्स्थापन सुनिश्चित केल्याशिवाय त्यांना त्यांच्या जागेवरुन हटवून टाकल्यामुळे त्यांच्या प्रमुख अधिकाराचे मोठे उल्लंघन होण्यास वाढ होईल.

४४. (.....) ज्यावेळी कोणत्याही जमिनीवर बसलेल्या वस्तीधारकांना त्यांना त्या ठीकानावरुन हटवून टाकले जाण्याच्या धमकीचा सामना करावा लागतो. तर अशा परिस्थितीमध्ये निष्पक्षता बरोबर त्यावर विचार करण्याची गरज आहे, भले त्यांच्या झोपड्यांच्या समूहाला कायद्याने सार्वजनिक परियोजनासाठी हटवून टाकण्याची गरजच का नाही. कारण कि अशा स्थितीमध्ये याचे परिणाम खूप विनाशकारी होऊ शकतात. खासकरुन ज्यावेळी पूर्वीपासून बसेलेल्या लोकांना बेदखल केले जाते. त्या स्थितीमध्ये खासकरुन जी अनदेखी केली जाते, ती ही आहे कि, एका परिवाराला शक्तीपुर्वक बेदखलग केले गेल्यावर त्या परिवाराचा प्रत्येक सदस्य कमी भावात आपल्य अधिकारांना हारवून बसत असतो. म्हणजेच आजीविकेचा आधिकार, निवास, शिक्षण, आरोग्याचा अधिकार, नागरिक किंवा सार्वजनिक परिवहन सुविधांचा अधिकार आणि एकूण सन्मानपूर्वक जगण्याचा अधिकार.

५७. हे न्यायालय संज्ञान घेऊ शकते कि. मास्टर प्लान (एमपीडी) च्या संदर्भात झोपड्यांमध्ये राहणाऱ्या लोकांच्या बरोबर दुय्यम दर्जाच्या नागरिकांच्या सारखे व्यवहार नाही करत. ते अन्य नागरिकांच्या प्रति जगण्यासाठी आवश्यक मुलभूत गरजांच्या पोहचण्यापर्यंत लोकांची शक्ती नसते. अगर झोपडपट्टी वासियांना जबरदस्तीने बेदखल केले असेल, किंवा इतर जागेवर लोकांना हलवले असेल, तर हे सुनिश्चित करने राज्याची संविधानिक व कायदेविषयक बाध्यता आहे कि, प्रभावित झोपडपट्टी निवासी चांगल्या परिस्थित नाहीत. पुनर्स्थापन उत्तम होण्याबरोबर झोपडपट्टी वासियांचे अधिकार (जगण्याचा अधिकार, आजीविका व सन्मानाचा अधिकार) बरोबर समजदार पूर्ण आसावे.

पी के कौल विरुद्ध इस्टेट अधिकारी व इतर (२०१०) १० मध्ये दिल्ली उच्च न्यायालयाने निर्धारित केले आहे.

४०. (.....) प्रत्येक नागरिकाला देशाच्या कोणत्याही भागात निवास करण्याचा व बसण्याचा अधिकार भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १९ (१)

(इ) च्या अंतर्गत मुख्य अधिकाराच्या रुपात समाविष्ट आहे. निवासाचा अधिकार ह्या अधिकाराशी अभिप्रेत आहे. किंवा भारताच्या संविधानामध्ये नमूद अनुच्छेद २१ च्या अंतर्गत 'जगण्याच्या अधिकाराची' सार्थकतेसाठी विभिन्न अंगासारखे मान्य आहे.

---

१०. पी. के. कौल विरुद्ध इस्टेट ऑफिसर व इतर रिट पिटीशन (सी) नं. १५२३९ / २००४ व सीएम नं. ११०११ / २००४ दिल्ली उच्च न्यायालय, ३० नोव्हेंबर २०१०

# जबरदस्तीने बेदखल केलेल्या परिस्थितीमध्ये महाराष्ट्रातील कायद्याच्या अंतर्गत आपले काय अधिकार आहेत.

महाराष्ट्र राज्यामध्ये अनेक कायदे आहेत जे बेदखल, घरांना पाडून टाकण्याचा व जमीन अधिग्रहण करण्याच्या स्थितीमध्ये नागरिक अधिकारापासून संबंधित खटल्याचा समावेश असतो. ते पुढील प्रकारे.

**झोपडपट्टी पुनर्वसन योजना** – महाराष्ट्रात गृहनिर्माण मंडळाची स्थापना करताना या मंडळातर्फे झोपडपट्टी वासियांना अल्प किंमतीची घरे बांधली जातील असे महाराष्ट्र शासनाने जाहिर केले होते. १९९० साली महाराष्ट्र शासनाने झोपडपट्टी वासियांना पुनर्वनस योजना जाहिर केली त्याला एस.आर.डी. असे नाव देण्यात आहे. या जोयनेनुसार कुणाही विकासकाने पुनर्वसनाची योजना सरकारला सादर करावी आणि त्याकरिता अटी अशा आहेत की, प्रत्येक पात्र झोपडीधारकाने विकासकाला रु. १५,०००/- द्यावेत विकासकाने जमीन मालकाशी व्यवहार करुन त्याला विनाहरकत दाखला सादर करावा. प्रत्येक पात्र झोपडी धारकाला १८० चौरस फुटाचे (कार्पेट) घर त्याने दिलेल्या रु. १५,०००/-मध्ये बांधून द्यावे आणि या मोबदल्यात त्याला शासनाकडून अडीच चटई क्षेत्र निर्देशांक (म्हणजे मूळ जमीन क्षेत्रपळाच्या अडीच पट) देण्यात येईल आणि या वाढीव क्षेत्रफळावर आधिक खोल्या बांधून त्याने आपला खर्च आणि नपा कमवावा. अशी ही योजना होती. त्या फारसा प्रतिसाद मुंबई शहरात मिळाला मात्र नाही. म्हणून त्यानंतर १९९५ साली शिवसेना आणि भाजपाची सत्ता महाराष्ट्रात आल्यावर त्यांनी हिच गोष्ट एस.आर.ए. ह्या नावाने लागू केली फरक फक्त एवढाच केला कि पात्र झोपडपट्टी धारकाने भरावयाचे रु. १५,०००/- भरावे लागणार नाही. शिवाय १८० चौरस फुटा ऐवजी २२५ चौरस फुटांचे मोफत घर देण्यात यावे, शिवाय विकासकाने प्रत्येक झोपडी धारकाच्या नावावर रु.२०,०००/- अनामत रक्कम एस.आर.ए. कडे पुढील सहकारी संस्थेच्या देखभाल खर्चासाठी ठेवावेत. त्याबद्दल मिळणाऱ्या अडिच चटई क्षेत्र निर्देशकाची टोपी काढून टाकण्यात आली. आणि जेवढ्या क्षेत्रफळावर तो झोपडी धारकांना मोफत घर बांधून देईल. तेवढेच क्षेत्रफळ त्याला बाहेरील लोकांना विकण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आले हाच काय तो फरक या योजने अंतर्गत गेल्या १० वर्षात फक्त २५,०००/- घरे बांधण्यात आल्याचे सरकारचे आकडे सांगतात.

### १. मुंबईचा मास्टर प्लान २०१४–२०३४

महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना कायद्यानुसार महानगरपालिकेसाठी विकास आराखडा तयार करणे आणि त्याची अमंलबजावणी करणे बंधन कारक झाले आहे. त्यानुसार मुंबई महानगरपालिकेने सन २०१४ ते २०३४ च्या प्रास्ताविक विकास आराखड्याच्या (डेव्हलपमेंट प्लान) भू-वापराच्या सर्वे पूर्ण करुन नियोजनाचे काम सुरु आहे कायद्यानुसार अमंलबजावणी करण्यासाठी बाहेर च्या लोकांची मदत घेतली जात असून स्थानिक लोकांना डावळले जात आहे.

मुंबईचा आराखडा हा केवळ कागदोपत्री रंगवलेला किंवा तांत्रिक तपशील असलेला दस्तावेज न बनविता नागरिकांच्या दैनंदि जीवनाशी निगडीत असलेले नियोजन असले पाहिजे. ज्याच्या आधारे लोकांचे राहणीमान सुधारेल आणि त्यांना पुरेशा नागरी सुविधा देऊन आनंदात राहता येईल.

लोकशाही समाज व्यवस्थेत समाजातील सर्व घटकांना विकासाच्या समान संधी उपलब्ध करुन देणे गरजेचे  असते याच भूमिकेतून युवा वर्ग देखील लोकसंख्येचा महत्वाचा घटक आहे.

१३ ते ३५ वयोगटातील युवांची ४०.६ टक्के एवढी लोकसंख्या आपल्या देशाचे मोठे मानवी संसाधन आहे. तसेच सामाजिक आणि आर्थिक विकासाचे वाहक सुद्धा आहे म्हणून युवांना ह्या प्रक्रियेमध्ये सहभागी करुन घेणे गरजेचे आहे.

त्यामुळे युवांवर्गा सोबत काम करणाऱ्या विविध समाजिक संस्था आणि बैठका घेऊन चर्चा करण्यात आल्या. मुंबईचा २० वर्षाचा विकास आराखडा तयार करताना युवांच्या सर्वांगीन दूरदर्शी व ध्येयवादी विकासासाठी शिक्षण, रोजगार, निवारा, आरोग्य आणि पायाभूत सोई-सुविधांच्या अंगाने विचार केल्याशिवाय त्यांचा विकास होणार नाही. म्हणूनच त्या दृष्टीने खालील बाबींचा विचार विकास आराखड्यात विचार करण्यात यावा अशा बाबी.

- शिक्षण :- शिक्षणातून युवाना वैचारिक सामर्थ्य, कार्यकृती, भविष्याची प्रेरणादायी दिशा मिळते. म्हणून शिक्षण पुरविणे हे शासनाचे घटनात्मक दायित्व असून आर्थिक, सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने तसेच भविष्यात उज्वल पिढी घडविण्यासाठी शिक्षण हा महत्वाचा घटक आहे. त्यामुळे मुंबई विकास आराखड्यात शिक्षणाच्या दृष्टीने खालील सेवा - सुविधा आरक्षित करुन ठेवणे आवश्यक आहे.

- शाळा / कॉलेज यांची उपलब्धता व सोई - सुविधा १८ वर्षापर्यंत युवांना सक्तिचे गुणवत्तापुर्ण शिक्षण मिळवून देण्यासाठी शाळा, कॉलेज निर्माण करने व सेवा - सुविधा देणे. समाजातील वंचित, उपेक्षीत वर्गातील घटकांना विनामुल्य शिक्षण, शिष्यवृत्ती, वसतीगृहे निर्माण करुन देणे.

- वाचनालय / स्टडी सेंटर सुरु करणे.

- प्राथमिक केंद्र / ट्रेनिंग सेंटर - व्यवसाय प्रशिक्षण देण्यासाठी व्यवस्था करण्यात याव्या. कठीण परिस्थितीतून जाताना त्याचा सामना कसा करावा, त्यावर मात कशी करता येईल त्याचे ट्रेनिंग प्रशिक्षण केंद्रात देण्यात यावे.

- रोजगार - रोजगाराची आज मोठी समस्या आहे. ग्रामीण भागातून युवा शहरांकडे नोकरीसाठी येतात. रोजगाराचा हक्क नाकारल्याने मानसिक ताण व न्यूनगंड निर्माण झाल्याने त्यांचे खच्चीकरण होते म्हणून खालील उपाय करावेत.

- एमप्लायमेंट एक्सचेंज जिल्हा पातळीवर असलेले एमप्लायमेंट एक्सचेंजचे विकेंद्रीकरणावरुन वार्ड स्तरावर सुरु करण्यात यावे.
- एक खिडकी योजना - स्वताचा व्यवसाय सुरु करुन स्वताच मालक होणे यासाठी एक खिडकी योजनेद्वारे रोजगार किंवा स्वयं रोजगाराच्या संधी निर्माण करुन देणे
- माहिती केंद्र - चर्चगेट येथे असलेल्या माहिती केंद्रावर युवांची तुफान गर्दी असते, हे लक्षात घेऊन माहिती केंद्राची सर्व वार्ड स्तररावर निर्माण करने करजेचे आहे.
- निवास - शिक्षण आणि नोकरीच्या निमित्ताने स्थलांतर मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे लोकसंख्येत वाढ होते त्यामुळे निवासाचा प्रश्न सर्वांना भेडसावत आहे.
- भाडेतत्वावर घरे निर्माण करावीत. युवा वसतिगृहे (युथ होस्टेल्स) युवांना नोकरी, व्यवसाय, शिक्षण, मुलाखती मार्गदर्शन व प्रशिक्षणासाठी वेळोवेळी शहरांमध्ये ये-जा करावी लागते म्हणून निवासासाठी प्रत्येक वार्ड मध्ये अशी घरे व वसतिगृह निर्माण करावीत. त्याचबरोबर युवा शेल्टर होम्स देखील असावीत, रस्त्यावर राहणारे युवक आणि युवतींना अचआयव्ही पॉसिटीव्ह आणि तृतीय पंथीसाठी चिल्ड्रन होम च्या धर्तीवर स्वतंत्रपणे युवा शेल्टर होम उभारण्यात आली पाहिजेत.

**आरोग्य - आरोग्यावर मात करण्यास खालील उपाय करणे गरजेचे आहे.**

- सामुपदेशन केंद्र (कौन्सिल सेंटर) देशाच्या युवा शक्तीच्या उर्जेची बीजे किशोरावस्थेतील मुले-मुली यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्राधान्य देणे. व्यसन अमंली पदार्थाच्या आहारी जाण्यामागे नैराश्य कारण असते. अशावेळी धुम्रपान व मादक पदार्थाच्या सेवनास आळा घालण्यास सामूउपदेशान केंद्र (कौन्सिल सेंटर) ची गरज असते.

**पायाभूत सुविधा -**

- खेळाचे मैदान - मनोरंजन आणि खेळ हे युवांच्या सर्वांगीण विकासातील महत्वाचे घटक आहेत. खेळामुळे शारिरिक क्षमतेत वृद्धी, सकारात्मक संकल्पनांचा विकास आणि सहिष्णूता, सांघिक भावना व आरोग्य संवर्धन विकसित होते. यासाठी क्रीडा आणि मनोरंजन विकासासाठी भूखंड आरक्षित ठेवणे.

- स्पोर्ट्‌स क्लब - विकास आराखड्यात मैदानासाठी व उद्यानांसाठी राखीव ठेवलेले भूखंड पुर्णपणे विकसित करुन युवा खेळाडूंसाठी उपलब्ध करुन द्यावीत. महिलांसाठी पूर्णता / अंशतः वेळ राखून ठेऊन विशेष प्राधान्य द्यावे. शारीरिक व्यायाम, योगा, ध्यान यांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी स्पोर्ट्‌स क्लब महत्वाची भूमिका बजावत असतात.
- समाज केंद्र - स्थानिक परंपरा, सांस्कृतिक आदान - प्रदान करण्यासाठी समाज केंद्र आवश्यक आहेत.
- सार्वजनिक स्वच्छता गृह - प्रत्येक वस्तीमध्ये २० माणसांमागे किमान एक शौचालय या प्रमाणे सार्वजनिक मुबलक स्वच्छता गृह असावेत. पुरुषांसह महिलांसाठी मोफत मुताऱ्यांची सोय करण्यात यावी.
- नैसर्गिक आपत्ती, स्थलांतर, अचानक उद्‌भवणारी आपत्ती यामुळे प्रभावित होणाऱ्या युवांना शिक्षण, निवारा व उपजीविकेची साधन तातडीने उपलब्ध करण्याची व्यवस्था असावी.
- गुन्हेगारीला आला घालण्यासाठी व महिलांच्या सुरक्षेसाठी जागोजागी पोलीस स्टेशन / चौकी उभारण्यात याव्यात.

शहराच्या रचनेचे सामाजिक, आर्थिक, भौगोलिक आणि पर्यावरणीय मापदंड लक्षात घेऊन शहर विकास आरखड्यातील तपशील सूक्ष्म अभ्यासाने नोंदवले जायला हवेत. या शहराच्या विकासासाठी आणि वीनाशासाठीही पर्यावरण हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. त्यानुसार मुंबई महानगरपालिकेने प्रस्ताविक विकास आराखड्याच्या (डेव्हलपमेंट प्लान) भू-वापराचा सर्वे पूर्ण करुन नियोजनाचे काम पूर्ण केले आहे. त्यात असंघटीत कामगार, भूपुत्रांच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्यामुळे विविध संघटनांनी पालिकेकडे आक्षेप नोंदविला आहे. तेव्हा युवकांच्या दृष्टीने मुंबईचा विकास आराखडा तयार करताना केवळ वैयक्तीक लक्ष न देता व्यापक हिताचा सामुहिक विचार झाला पाहिजे.

## ३. मुंबई विकास प्राधिकरण अधिनियम (एम. एम. आर. डी. ए) १९५६

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन कायदा १९५६ साली महाराष्ट्र सरकारने तयार करण्यात आला त्याची व्याप्ती पूर्ण महाराष्ट्र असून जमिनीच्या उपयोगाचे नियोजन करणे हे महत्वाचे काम या कायद्याचे आहे. पूर्ण महाराष्ट्रामध्ये अनेक प्रांतामध्ये विभागलेला असून मुंबई आणि मुंबईच्या परिसरातील जमिनीचे नियोजन करण्यासाठी बी.एम.आर.डी.ए. बॉम्बे मेट्रोपोलिटन रिजनल डेव्हलपमेंट अथोरीटी ची स्थापना केलेली आहे. बी.एम.आर.डी.ए. दर २० वर्षांनी मुंबईचा विकास आराखडा बनवत असते. सद्या चर्चेत असलेला २०१४ ते २०३४ चा विकास आराखडा हा तिसरा आराखडा असून प्रथमच या आराखड्याबाबत सर्व स्थरावर चर्चा चालू आहे. या आराखड्याचा लॅन्ड युज म्याप तयार झाला असून त्यामध्ये अनेक त्रुटी असल्याने स्वयंमसेवी संस्था व काही राजकीय पक्षांनी दाखवलेली आहे.

मुंबई महानगर पालिका प्रथमच हा आराखडा लोकांच्या चर्चेसाठी अनेकवेळा ठेवत आहे. व त्यापैकी काही सुचना प्रत्यक्ष मान्यही करण्यात येते आहेत. हा आराखडा मुंबई महानगर पालिकेमध्ये पास झाल्यानंतर एम.एम.आर.डी.ए. तर्फे महाराष्ट्र शासनाच्या सहमतीसाठी पाठवला जाईल.

म्हाडा

